**—: प्रेस नोट :—**                                   **दिनांक : ०२.०५.२०१९**

| | |
|---|---|
| घटक | ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.राजेद्र लक्ष्मणराव सुरजुसे, वय ४९ वर्षे,पद — ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,वनारसी ता.जि.अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ६०००/— रुपये |
| घटनास्थळ | मधुबन हॉटेल चे शेडमध्ये,पंचायत समीती कार्यालय,अमरावती चे बाजुला,अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | ०२/०५/२०१९ चे अंदाजे १५.१२ वा. दरम्यान |

<u>**थोडक्यात माहिती**</u> :— यातील तकारदार हे वनारसी गावामधील रहीवासी असुन त्यांचे वडील हे मृत पावले असल्याने वडीलांचे नावावर असलेले घर त्यांचे नावावर करून देण्यासाठी ( फेरफार करून देण्यासाठी ) ग्रामपंचायत कार्यालय वनारसी येथील ग्रामसेवक श्री.सुरजुसे हे ६,००० रूपये लाचेची मागणी करीत असल्याची दि.२९.०४.२०१९ रोजी तकार दिली असता दि.३०.०४.२०१९ रोजी पंचासमक्ष ग्रामपंचायत कार्यालय वनारसी येथे जावुन ग्रामसेवक श्री.सुरजुसे यांची पडताळणी केली असता ग्रामसेवक श्री.सुरजुसे यांनी तकारदार यांचे कागदपत्रे पाहुन ५०० रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा लेख आणण्याचे सांगुन फेरफार करून देण्यासाठी ६००० रूपये लाचेची मागणी करून दोन तारखेला लागणारे कागदपत्रे घेवुन येण्याचे सांगुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.आज दि. ०२.०५.२०१९ रोजी ग्रामसेवक श्री.सुरजुसे यांनी तकारदारास पंचायत समीती कार्यालय अमरावती येथे बोलावुन सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष ग्रामसेवक श्री.सुरजुसे यांनी पंचायत समीती अमरावती चे बाजुला असलेल्या मधुबन हॉटेल येथे सदर लाच रक्कम ६,०००/— रुपये तकारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले व गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री. श्रीकांत धिवरे सा.,अपर पोलीस अधीक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे व पोलीस उप अधीक्षक,घटक प्रमुख श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राहुल वसंतराव तसरे व पो. कर्मचारी विनोद कुंजाम, सुनिल जायभाये,वैभव जायले व चालक सतिश किटुकले यांनी पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— ॲन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी कमांक — ०७२१—२५५२३५५,२५५३०५५.

(राहुल तसरे)
पोलीस निरिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.
मो.कं.८८०५१६३१००

Scanned by CamScanner